## प्रकरण **5** वे

जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधीकडून एखादे धोरण ठरविण्यासाठी त्यांच्याशी सल्लामसलत, तसेच सहभाग घेण्याची यात तरतूद केलेली आहे. जर रुग्णालयात नवीन विभाग किंवा एकदा विभागात सुधारणा करावयाची असल्यास त्याचा खर्च रू.10,00,000/- (दहा लाख) किंवा एखादे उपकरण ज्याची किंमत रु. 10,00,000/- (दहा लाख) पेक्षा अधिक असेल तर त्याचा प्रस्ताव मुंबई महानगर पालिकेच्या स्थायी समितीकडे मंजूरीसाठी पाठवून मंजूरी घ्यावी लागते या स्थायी समितिमध्ये जनतेने निवडून दिलेले लोकप्रतिनिधी असतात.

दक्षता समिती मध्ये रुग्णालयातील वरिष्ठ अधिकारी व लोकप्रतिनिधी असतात. त्यांची महिन्यातून एकदा एकत्रा येवून सभा होते व त्यात रुग्णालयात येणा-या रुग्णांच्या समस्या असल्यास सोडविल्या जातात.